# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar
## Date – 18 January 2026
## Time 18.10 to 18.20
## Language Marathi
## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर
## प्रादेशिक बातम्या
## दिनांक – १८ जानेवारी २०२६ सायंकाळी ६.१०

****

- विकास कामांमुळं भारतीय जनता पक्षाला महापालिका निवडणुकीत विक्रमी यश – पंतप्रधान नरेंद्र मोदी
- मुख्यमंत्री आर्थिक परिषदेसाठी दावोसमध्ये
- विमानसेवेतील त्रुटींमुळं इंडीगोला २० कोटी ४० लाख रुपयांचा दंड

आणि

- न्यूझीलंडविरुद्धची क्रिकेट मालिका जिंकण्यासाठी भारतासमोर ३३८ धावांचं लक्ष्य

****

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते आज सकाळी आसाम मधील काझीरंगा उन्नत मार्ग प्रकल्पाची पायाभरणी करण्यात आली.सुमारे सात हजार कोटी रुपये गुंतवणुक असलेल्या आणि राष्ट्रीय महामार्ग, एनएच-७१५ च्या कालियाबोर-नुमालीगढ विभागाचं चौपदरीकरण याद्वारे प्रस्तावित आहे. देशात प्रकृती आणि प्रगती एकसमान सोबतीनं विकसित होत आहेत असं पंतप्रधान मोदी यावेळी म्हणाले. आपल्या सरकारच्या विकास कामांमुळं भारतीय जनता पक्षानं महाराष्ट्रात नुकत्याच झालेल्या महापालिका निवडणुकीतही स्पष्ट बहुमत दिल्याचा उल्लेखही मोदी यांनी यावेळी केला. ते म्हणाले...

**बाईट – पंतप्रधान नरेंद्र मोदी**

****

स्वित्झर्लंडमध्ये उद्यापासून सुरु होत असलेल्या जागतिक आर्थिक मंचाच्या परिषदेत सहभागी होण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आज दावोस इथं पोहोचले. झ्युरिक

विमानतळावर केंद्रीय मंत्री के. राममोहन नायडू आणि प्रल्हाद जोशी यांनी फडणवीस यांची भेट घेतली, आणि महानगरपालिका निवडणुकांमधे यश मिळाल्याबद्दल त्यांचं अभिनंदन केलं. उद्योग मंत्री उदय सामंत आणि प्रशासनातल्या उच्चपदस्थ अधिकाऱ्यांचं पथक मुख्यमंत्र्यांच्या समवेत आहे. या परिषदेदरम्यान, जागतिक उद्योग गट, गुंतवणूकदार आणि धोरणकर्त्यांशी चर्चा करून महाराष्ट्रात थेट परकीय गुंतवणूक, औद्योगिक प्रकल्प, रोजगार निर्मिती आणि आर्थिक विकासाला चालना देण्यावर विशेष भर दिला जाईल. भारताचं विकास इंजिन म्हणून जागतिक मंचावर 'मॅग्नेटिक महाराष्ट्र' अभियानाचा पुरस्कार करण्याचा संकल्प असल्याचं मुख्यमंत्री कार्यालयाच्या पत्रकात म्हटलं आहे. जागतिक आर्थिक मंचाच्या परिषदेसाठी दावोस मध्ये कडक सुरक्षा व्यवस्था तैनात करण्यात आली आहे. २३ जानेवारीपर्यंत चालणाऱ्या या परिषदेत ३ हजारापेक्षा जास्त जागतिक नेते सहभागी होणार आहेत. 'अ स्पिरिट ऑफ डायलॉग' ही यंदाच्या परिषदेची संकल्पना आहे.

****

दावोसला रवाना होण्यापुर्वी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अमेरिकेचे भारततले राजदूत सर्जियो गोर यांच्याशी चर्चा केली. मुंबईत मुख्यमंत्र्यांच्या वर्षा निवासस्थानी झालेल्या बैठकीला अमेरिकेचे कौन्सुल जनरल मायकेल स्क्रूडर देखील उपस्थित होते. राज्यात अमेरिकन गुंतवणुकीला प्रोत्साहन देण्यासह उभयपक्षी सहकार्याच्या विविध मुद्द्यांवर यावेळी चर्चा झाल्याचं फडणवीस यांनी समाजमाध्यमावर लिहीलं आहे.

****

पुणे-सोलापूर राष्ट्रीय महामार्गावर मोहोळनजिक देवडी पाटीजवळ मध्यरात्री झालेल्या भीषण मोटर अपघातात पाच जण ठार तर एक जण जखमी झाला. काल मध्यरात्रीनंतर पनवेलहुन अक्कलकोटला देवदर्शनासाठी जाणाऱ्या मोटारच्या चालकाचा ताबा सुटून रस्त्याच्या कडेला ती झाडावर आदळल्यानं ही दुर्घटना झाली. मृतात तीन पुरुष-दोन महिलांचा समावेश असून अन्य एक महिला जखमी झाली.

****

विमानसेवा पुरवणाऱ्या इंडिगो कंपनीला नागरी विमान वाहतूक मंत्रालय आणि नागरी विमान वाहतूक संचालनालयाने गेल्या महिन्यात रद्द झालेल्या विमानांच्या पार्श्वभूमीवर २० कोटी ४० लाख रुपयांचा दंड ठोठावला आहे. या कंपनीला

परिचालन सुधारण्यासंदर्भात, जबाबदारांविरुद्ध कारवाई करण्यासंदर्भातील निर्देश देण्यात आले आहेत. प्रामुख्याने गेल्या तीन ते पाच डिसेंबर दरम्यान या विमानसेवेची वाहतूक सेवा पूर्णपणे विस्कळित झाली होती. त्याचा लाखो प्रवाशांना फटका बसला होता. नागरी विमान वाहतूक मंत्रालयानं या संदर्भात चौकशीसाठी चार सदस्यीय समिती स्थापन केली होती. या समितीच्या अहवालानुसार हा दंड ठोठावण्यात आला आहे.

****

विदर्भातील नैसर्गिक संसाधनं, कृषी क्षेत्र आणि कृषी आधारित उद्योग तसंच सेवा क्षेत्र यांचं व्यवस्थापन करून विदर्भात भांडवली उद्योग स्थापन करून मोठ्या प्रमाणात रोजगार निर्मिती होईल, असं केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी म्हटलं आहे. असोसिएशन फॉर इंडस्ट्रियल डेव्हलपमेंट यांच्या वतीनं ‘अॅडव्हांटेज विदर्भ २०२६- खासदार औद्योगिक महोत्सव’ नागपूर मधे राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठ परिसरात आयोजित केला जाणार आहे. याची माहिती देण्यासाठी आयोजित केलेल्या वार्ताहर परिषदेत ते आज नागपुरमध्ये बोलत होते.

****

७७ व्या प्रजासत्ताक दिन सोहळ्यात यंदा महाराष्ट्राचा चित्ररथ गणेशोत्सव – आत्मनिर्भरतेचं प्रतीक या संकल्पनेवर आधारित असेल. या चित्ररथातून राज्याची परंपरा आणि अर्थव्यवस्थेचं दृष्य साकारलं जाणार आहे. युरोपियन कौन्सिलचे अध्यक्ष अँटोनियो कोस्टा आणि युरोपियन कमिशनच्या अध्यक्षा उर्सुला वॉन डेर लेयन प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. यंदा प्रथमच बॅटल अॅरे या युद्ध रचनेचं प्रदर्शन प्रजासत्ताक दिन संचलनात होणार असून अर्जुन टँक, टी-९० भीष्म, राफेल विमानं आणि स्वदेशी बनावटीच्या अत्याधुनिक शस्त्रास्त्रांची चित्तथरारक प्रात्यक्षिकं होतील. संचलनात लष्कराच्या १८ तुकड्या आणि १३ बँड्ससह एकूण ३० चित्ररथ सहभागी होतील.

****

न्यूझीलंडविरुद्ध इंदूर इथं सुरू तिसऱ्या आणि निर्णायक एकदिवसीय क्रिकेट सामन्यात विजयासाठी भारतीय संघासमोर ३३८ धावांचं लक्ष्य आहे. डेरील मिचेलच्या १३१ चेंडुंमधील १३७ धावा आणि ग्लेन फिलीप्सच्या ८८ चेंडुंमधील १०६ धावांमुळं न्यूझीलंड संघानं डळमळीत सुरुवातीनंतरही तिनशे धावांचा टप्पा ओलांडत ५० षटकांत आठ बाद ३३७ धावा केल्या. अर्शदीप सिंग आणि हर्षित

राणानं प्रत्येकी तीन खेळाडू बाद केले. या मालिकेतला पहिला सामना भारतानं जिंकल्यानंतर दुसऱ्या सामन्यात पाहुण्या संघानं विजय नोंदवला आहे.

****

अकरावा अजिंठा वेरूळ आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवादरम्यान  येत्या २८ जानेवारी ते १ फेब्रुवारी दरम्यान छत्रपती संभाजीनगर इथं महात्मा गांधी मिशन एमजीएम इथं होणार आहे. या निमित्त दिला जाणारा प्रतिष्ठेचा पद्मपाणि पुरस्कार यंदा भारतीय सिनेसृष्टीतील अतुलनीय योगदानाबद्दल ज्येष्ठ संगीतकार, पद्मविभूषण इलयाराजा यांना जाहीर झाला आहे. महोत्सव संयोजन समितीतर्फे आज या संदर्भातली माहिती देण्यात आली.

****

छत्रपती संभाजीनगर महापालिकेत नव्या सभागृहात आता दहा स्वीकृत सदस्य नेमण्यात येणार असल्याची माहिती महापालिका प्रशासनातर्फ देण्यात आली आहे. त्यामुळं एकूण सदस्यसंख्या १२५ वर जाणार आहे. निवडणुकीत ११५ नगरसेवक निवडून आले आहेत, मात्र २०२३ च्या शासन आदेशानुसार १० स्वीकृत नगरसेवक नेमण्यात येणार आहेत. यात भाजप ५ ते ६, एमआयएमचे तीन तर शिवसेनेला एक सदस्य मिळण्याची शक्यता आहे.

****

भारतीय जनता पक्षाचे नेते आणि माजी मंत्री राज के. पुरोहित यांचं आज निधन झालं. मुंबईतल्या रुग्णालयात राज पुरोहित यांनी वयाच्या ७१ व्या वर्षी अखेरचा श्वास घेतला. राज पुरोहित यांनी २५ वर्षांहून अधिक काळ महाराष्ट्र विधानसभेमध्ये आमदार म्हणून काम केलं. ते मुंबईतील मुंबादेवी आणि कुलाबा मतदारसंघातून चार वेळा विधानसभा निवडणुकांमध्ये निवडून आले होते. ते युती सरकारमध्ये कामगार, दुग्धविकास आणि संसदीय कार्य मंत्री होते. त्यांनी गृहनिर्माण मंत्री म्हणूनही काम केलं होतं. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी त्यांच्या निधनाबद्दल दुःख व्यक्त केलं आहे.

****

देशभरातले भाविक मौनी अर्थात पौष दर्श अमावस्येनिमित्त देशभरात ठिकठिकाणी नद्यांमध्ये पवित्र मानल्या जाणाऱ्या स्नानासाठी गर्दी करत आहेत. उत्तर प्रदेशातील

प्रयागराज इथं त्रीवेणी संगमावर हजारो भाविकांनी मोठ्या संख्येनं माघ मेळ्यांतर्गत स्नानासाठी आज गर्दी केली आहे.

****

सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर कुंभमेळा प्राधिकरणानं मंजुरी दिल्यानंतर त्र्यंबकेश्वर पालिकेनं दहा आखाड्यांमध्ये पायाभूत सुविधा उभारण्यासाठी ७ कोटी ५५ लाख रुपयांच्या निविदा मागवल्या आहेत. कुंभमेळ्यातल्या १३ प्रमुख आखड्यांपैकी दहा आखाडे त्र्यंबकेश्वर इथं आहेत. प्रशासनानं या आखाड्यांमध्ये साधूंसाठी पिण्याचं पाणी, स्वच्छता गृह, अंतर्गत रस्ते आणि निवारा बांधून देण्याचा निर्णय घेतला आहे.

****

पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांनी वाराणसीत बांधलेल्या मणिकर्णिका घाटावर सरकारनं बुलडोझर चालवल्यानं देवतांच्या मूर्ती उध्वस्त झाल्याचा आरोप करत सरकारनं माफी मागावी अशी मागणी कांग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी आज मुंबईत पत्रकार परिषदेत केली. कांग्रेस पक्ष थेट काशीत आणि राज्यभर या प्रकरणी आत्मक्लेश आंदोलन करणार असल्याचा इशाराही त्यांनी यावेळी दिला. मुंबईत कांग्रेस नेत्यांसोबतच्या बैठकीनंतर माध्यमांशी बोलताना सपकाळ यांनी काशीतील मणिकर्णिका घाटाचा मुद्दा उपस्थित केला.

****

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातल्या खुलताबाद नगर परिषदेच्या उपनगराध्यक्ष निवडणुकीत भाजप उमेदवाराला मतदान केल्यामुळं काँग्रेस पक्षानं आपल्या चार नगरसेवकांवर निलंबनाची कारवाई प्रस्तावित केली आहे. पक्षाचे तालुकाध्यक्ष अनिल नलावडे यांनी हा प्रस्ताव जिल्हाध्यक्ष किरण पाटील डोणगावकर यांच्याकडे पाठवला. जिल्हाध्यक्षांनी तो पुढील निर्णयासाठी काँग्रेस प्रदेशाध्यक्षांकडे सादर केला आहे. गेल्या शुक्रवारी झालेल्या निवडणुकीत काँग्रेसच्या अधिकृत भूमिकेला विरोध करत चार नगरसेवकांनी भाजपचे उमेदवार नवनाथ बारगळ यांना मतदान केलं.यात बारगळ विजयी झाले.

****